# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०९/२०२६ (शुक्रवार )

...........................................................................................................

## दरोडा टाकुन मेंढ्या—बकऱ्या चोरी करणाऱ्या तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागणुक देणाऱ्या टोळीवर नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम १११ (संघटीत गुन्हेगारी) अन्वये करण्यात आली कारवाई, नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन जलालखेडा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलीसांनी दरोडा टाकुन मेंढ्या—बकऱ्या चोरी करणाऱ्या तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागणुक देणाऱ्या टोळीवर नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम १११ संघटीत गुन्हेगारी अन्वये कारवाई केली आहे.**

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पहाटे मौजा रोहणा, ता. नरखेड येथे फिर्यादी मारोतराव बांबल यांच्या शेतातील गोठ्यावर ४ अनोळखी आरोपींनी फिर्यादीचे हातपाय बांधून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर ४५ मेंढरे व १६ बकऱ्या असा एकुण किंमती २,८९,०००/— रूपयांचा मुद्देमाल जबरीने वाहनात भरून चोरून नेला होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अप क्रं ४५४/२०२६ कलम ३०९(४),३५१(२),३(५)भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयामध्ये **१) संतोष रामसिंग चव्हाण, वय ३६ वर्ष, रा वार्ड क्र. ०२ इंदिरा नगर, आष्टी जि.वर्धा ,२) देवेन्द्र उर्फ भुऱ्या राजेंद्र पवार, वय २९ वर्ष, रा. उमठा पारधी बेडा (जलालखेडा) जि. नागपुर ग्रा. ३) सतिश भोजणसिंग जाधव, वय २८ वर्षे, रा. रेडवा ता.चांदुर बाजार जि.अमरावती, ४) रोशन जुगल चव्हाण, वय २४ वर्षे रा. रेडवा ता.चांदुर बाजार जि.अमरावती, ५) सोन्याजी शेरू पवार, वय १९ वर्षे, रा.उमठा ता नरखेड जि.नागपुर**

**, ६) पवन दाऱ्या पवार ,वय २५ वर्षेरा.उमठा ता नरखेड जि.नागपुर ७) लखन उर्फ लोकेश शेरू भोसले, वय १९ वर्षे रा.उमठा ता नरखेड जि.नागपुर ८) वैभव विलासराव माहोरे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ खडकपुरा, आष्टी जि.वर्धा ९) अकुंश उर्फ चेतन केशवराव पोकळ, वय ३५ वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ खडकपुरा, आष्टी, जि.वर्धा, १०) योगेश दशरथ सरोदे, वय २१ वर्षे रा. रा. साहुर,ता.आष्टी जि वर्धा आणि आरोपी क्र ११) गोविंदा संजय पवार, वय २१ वर्षे,रा साहुर ता आष्टी, जि वर्धा** यांच्यासह ३ विधीसंघर्ष ग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला.आरोपी क्र. १ ते ११ यांना अटक करण्यात आले आहे. सदर **गुन्हयाचे तपासात सदर आरोपीतांना सदर गुन्हा संघटीत रित्या केल्याचे निष्पन्न झाल्याने** जलालखेडा पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम १११ ( संघटीत गुन्हेगारी ) अन्वये कलमवाढ कामी प्रस्ताव उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल यांच्या मार्फतीने पोलीस अधीक्षक ,नागपुर ग्रामीण यांच्या कडे सादर केला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर केला असुन सदर आरोपी विरूध्द भारतीय न्याय संहीता कलम १११ ( संघटीत गुन्हेगारी ) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## धंतोली पोलीस स्टेशन येथे दाखल अंमली पदार्थाच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपीचा तात्काळा घेतला शोध
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०३/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीणचे पथकाने बुटीबोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत सातगाव परिसरात रात्रगस्त व कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे दाखल असलेल्या एन डी पी एस कयादयान्वयेच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस ताब्यात घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीणचे पथक बुटीबोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत सातगाव परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन धंतोली, नागपूर शहर येथे दाखल अप.क्र. १६९/२०२६ , कलम ८(सी), २०(बी)(२), २९ एन डी पी एस कयादा या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी शैलेश विजय सोनटक्के हा सातगाव परिसरात फिरत आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे

पोलीसांनी तात्काळ कारवाई करून सापळा रचुन आरोपी नामे **शैलेश विजय सोनटक्के, वय ३२ वर्षे, रा. तकिया, धंतोली, नागपूर** यास ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी नमुद आरोपीला पोलीस स्टेशन धंतोली, नागपूर शहर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या शासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पाश्‍र्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी गणेशोत्सव, श्रीकृष्ण जयंती, पोळा आणि इतर सणोत्सवांच्या विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०४/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य आणि पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये श्री प्रियांश महाजन, उपविभागीय अधिकारी रामटेक, श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग रामटेक, श्री रमेश कोलपे तहसीलदार रामटेक, पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, रामटेक पोलीस स्टेशन ,सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, देवलापार पोलीस स्टेशन , सहा पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे प्रभारी अधिकारी, अरोली पोलीस स्टेशन उपस्थित होते. तसेच पोलीस स्टेशन रामटेक येथे पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी रामटेक पोलीस स्टेशन यांनी गणेश मंडळ पदाधिकारी आणि डिजे मालक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य, डिजे मालक आणि पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक, श्री सुरेश वाघचौरे तहसीलदार, पारशिवनी तालुका, श्री आशीर्वाद नागपुरे, तालुका वैद्यकीय अधिकारी, पारशिवनी, श्री चंद्रकांत शेळमाके, उपअभियंता म.रा.वि.

वि.कंपनी पारशिवनी, श्री निखिल ढोले, कर निरीक्षक नगरपंचायत पारशिवनी, सहा पोलीस निरीक्षक, श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पारशिवणी, पीडब्ल्यूडी चे प्रतिनिधी, पंचायत समिती पारशिवनी चे प्रतिनिधी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी श्री शशांत गौडा सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस आधिकारी आणि  पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य आणि  डिजे मालक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन उमरेड:—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांनी आगामी सणोत्सव संदर्भात पोलीस पाटील, गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, पोळा सण आयोजक, पोलीस पाटील, शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन वेलतुर :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य आयोजक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर:—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी आगामी सणोत्सव संदर्भात

गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य आयोजक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन बेला :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांनी आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक घेतली.

सर्व आयोजकांना विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, मंडप उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घ्याव्यात, महावितरणकडून विद्युत जोडणीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी तसेच गणेश मंडपामुळे रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी दहीहंडी उत्सवासाठी आवश्यक परवानग्या घेणे, ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन करणे, १४ वर्षांखालील मुलांचा सहभाग टाळणे, चार थरांपेक्षा अधिक मानवी मनोरे उभारू नये, तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आगामी गणेशोत्सव, श्रीकृष्ण जयंती, पोळा आणि इतर सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. **तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**








गणेश उत्सव संबंधाने
शांतता कमिटी / पोलीस पाटील /
गणेश मंडळाचे पदाधिकारी यांची
बैठक












NDPS ACT
महाराष्ट्र पोलीस







## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत २ सराईत गुन्हेगार 'धोकादायक व्यक्ती' यांना एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन सावनेर :– **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर पोलीसांनी सराईत गुन्हेगार क्र १) संजय बालाजी कडु, वय ५२ वर्ष राह. वार्ड क्र. १ आदासा, ता. कळमेश्वर पो.स्टे. सावनेर, जिल्हा नागपूर आणि सराईत गुन्हेगार क्र २) रेहमान उर्फ रेहान समीम खान, वय २५ वर्ष, रा. सटवा माता मंदिरचे मागे, सावनेर, तह. पो. स्टे. सावनेर, जिल्हा नागपुर या दोन सराईत गुन्हेगार तसेच 'धोकादायक व्यक्ती' यांना एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द केले आहे.**

सराईत **गुन्हेगार** क्र १. **संजय बालाजी कडु, वय ५२ वर्ष, राह. वार्ड क्र. १ आदासा, ता. कळमेश्वर पो.स्टे. सावनेर, जिल्हा नागपूर** याचे विरूध्द अवैध दारूबाबत अनेक **गुन्हे** नोंद आहे. आरोपीच्या कृत्यांमुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले त्यामुळे त्यांच्या **जिवाला धोका निर्माण होत असे. आरोपीच्या** त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. गुन्हेगार क्र २) सराईत आरोपी नामे **रेहमान उर्फ रेहान समीम खान, वय २५ वर्ष, रा. सटवा माता मंदिरचे मागे, सावनेर, तह. पो. स्टे. सावनेर, जिल्हा नागपुर** याचेवर शरीरा विरुध्द व मालमत्ते विरुध्द

अनेक गुन्हे नोंद असुन **साथीदारांसोबत मिळून प्राणघातक हत्यारांनी हत्येचा प्रयत्न करणे, साथीदारांसोबत मिळून गंभीर दुखापत पोहोचवणे, प्राणघातक हत्यार जवळ बाळगणे, अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणे, साथीदारांसोबत मिळून घरफोडी करणे, सामान्य लोकांना घाबरवून—धमकावून अश्लील शिवीगाळ करणे व जीवे मारण्याची धमकी देणे, कायदेशीररित्या सुनावण्यात आलेल्या हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणे**. नमुद आरोपींच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये ते भय निर्माण करून दहशत पसरवित होते. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले आणि त्यांना अटक केले. पोलीसांनी आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. नमुद आरोपी गुन्हे करण्याच्या सवयीचे असुन त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते.

**दोन्ही आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने सावनेर पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी दोन्ही आरोपींचा स्थानबध्दतेचा आदेश काढला असता सावनेर पोलीसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेवुन दोन्ही आरोपींना कारागृहात स्थानबध्द केले आहे.**



गुन्हेगार संजय बालाजी कडु



गुन्हेगार रेहमान उर्फ रेहान समीम खान

# पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत सराईत गुन्हेगार‘ धोकादायक व्यक्ती’ पंकज मोहन बांगरे याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन कोंढाळी :— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे ,उपविभागिय पोलीस अधिकारी,काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढाळी पोलीसांनी पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत अभिलेखावरील सराईत गुन्हेगार पंकज मोहन बांगरे, वय २४ वर्षे, रा. सुकळी बेलदार ता. हिंगणा जि.नागपूर याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द केले आहे.**

**सराईत गुन्हेगार पंकज मोहन बांगरे, वय २४ वर्षे, रा. सुकळी बेलदार ता. हिंगणा जि. नागपूर याचे विरूध्द शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे (साथीदांरासह घरफोडी करणे, अल्पवयीन मुलीचे अपहरण करणे, चोरीचा प्रयत्न करणे, विनयभंग करणे व शासकीय मनाई आदेशाचे उल्लंघन करुन प्रतिबंधीत क्षेत्रात प्रवेश करणे** इत्यांदी गंभीर गुन्हे नोंद असुन आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी त्यांचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली. परंतु आरोपीने त्याची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने कोंढाळी पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी नमुद आरोपीचा स्थानबध्दतेचा आदेश काढला असता कोंढाळी पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.**



गुन्हेगार पंकज मोहन बांगरे

## सावनेर उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

पोलीस अधिकारी व अंमलदारांना कायदेविषयक बाबींचे अद्ययावत ज्ञान मिळावे तसेच तपास व न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या कायदेविषयक बाबींबाबत मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने दिनांक ०२/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, यांच्या आध्यक्षेत ही कायदेविषयक कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेत श्रीमती पल्लवी सोनवणे आणि श्री. आकाश काळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायालय, कळमेश्वर यांनी सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन कळमेश्वर आणि मोहपा येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांना विविध कायदेविषयक बाबी, तपासातील महत्त्वाचे कायदेशीर मुद्दे तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.**

सदर शिबिरास पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्यासह पोलीस स्टेशन कळमेश्वर आणि मोहपा पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. शिबिरात एकूण ०६ अधिकारी व २० अंमलदार सहभागी झाले होते. कायद्याच्या अद्ययावत तरतुदींची माहिती पोलीस अधिकारी व अंमलदारांना उपलब्ध करून देऊन तपासाची गुणवत्ता अधिक प्रभावी करणे आणि न्यायालयीन प्रक्रियेत कायदेविषयक अडचणी टाळणे, हा या मार्गदर्शन शिबिराचा प्रमुख उद्देश होता.





## काटोल शहरातील मोकाट जनावरांच्या मालकांविरूध्द १५ गुन्हे नोंद
## २५ जनावरे कोंडवाड्यात दाखल

काटोल शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर मोकाट जनावरांमुळे नागरिकांना होणारा त्रास तसेच वाहतुकीस निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन दिनांक ०४/०९/२०२६ रोजी काटोल पोलीस स्टेशन व नगरपरिषद काटोल यांच्या संयुक्त पथकाद्वारे मोकाट जनावरांविरोधात विशेष कारवाई केली. सदर कारवाईदरम्यान १५ मोकाट जनावर मलकांविरुद्ध कलम १००, १०६, ११७ म.पो.का. अन्वये गुन्हे नोंद केले आहे. असून एकूण २५ मोकाट जनावरे ताब्यात घेऊन नगरपरिषद काटोलच्या कोंडवाड्यमध्ये जमा करण्यात आली आहेत.

नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या पाळीव जनावरांना मोकाट सोडू नये तसेच सार्वजनिक रस्ते व वाहतुकीच्या ठिकाणी जनावरे सोडून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यांवर ०६ गुन्हे नोंद.

**दिनांक ०३/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात महाराष्ट्र जुगार कायदया अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी सट्टापट्टी आणि ५२ ताश पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण ११,६३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये २१ आरोपींताविरूध्द एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.**

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १. तरनजितसिंग रनजितसिंग बावरी, वय २७ वर्ष,रा. रूईखैरी ता जि नागपूर,२. जयदेवसिंग धरमसिंग बावरी, वय ३६ वर्ष, रा. वडनेर, ता हिंगनघाट जि वर्धा,३. राजेश शंकर सालोडकर, वय ४० वर्ष, रा पळसगाव, ता देवळी जि वर्धा ह.मू रूईखैरी ता जि नागपूर, ४. गनेश एकनाथ निमजे, वय ४० वर्ष रा. नविन वस्ती बोरी ,ता. जि. नागपूर हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी क्रं १) नीतीन संजय गुप्ता, वय ३३ वर्ष, वार्ड क्र. १५, एमआयडीसी कळमेशवर हा सट्टपट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे १ गुन्हा नोंद आहे, २) अक्षय इंदर धुर्वे, वय २४ वर्ष, राह. वार्ड क्र. १५ कळमेश्वर हा सट्टपट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे १ गुन्हा नोंद आहे आणि ३) हिमांशु गजानन संतापे, वय २२ वर्ष, राह. ब्राम्हणी वैशाली नगर, कळमेश्वर हा सट्टपट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे १ गुन्हा नोंद आहे. **(एकुण ३ गुन्हे नोंद आहे.) पोलीस स्टेशन नरखेड** येथे १) गणेश रमेशराव धकिते, वय ३२ वर्ष, वार्ड क्र. ०१ मोवाड २) फैय्याज रऊफ शेख, वय ३३ वर्ष, प्रभाग क्र. १० मोवाड,३) राजेश किसनाजी येवले वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६ मोवाड ४) प्रज्वल रत्नाकर खसारे, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६ मोवाड ५) योगेश अशोक घोरसे, वय २७ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०४ मोवाड ६) घनश्याम दयाराम कनीरे, वय ३६ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०३ मोवाड त नरखेड जि नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) शंकर गोमाजी आंबुलकर ,वय ४२ वर्ष रा. चिरवा ता मौदा, २)दिलीप संपतराव तिजारे ,वय ५२ वर्ष रा. श्विनगा प्लाट नं. ८७ मौदा ३) देवचंद आनंदराव हिंगे, वय ५० वर्ष रा.चिरवा,४)स्वप्नील नंदुजी सहारे वय ३३ वर्ष रा. चिरवा ता. मौदा,५)नरेश राजु तिजारे वय २२ वर्ष रा. चिरवा ता मौदा,६)विजय श्रीराम निंबार्ते वय ४८ वर्ष रा. चिरवा ता मौदा ,७)निखिल मोरेश्वर निबार्ते,वय २६ वर्ष रा. चिरवा ता मौदा,८) रामदास सोमाजी आंबुलकर वा ४० वर्ष रा. चिरवा ता मौदा ,जि. नागपुर,हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **वर प्रमाणे २१ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा